*मतदानाचा पवित्र हक्क बजावणा-या जिल्हयातील मतदारांचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी मानले आभार*

*जिल्हा प्रशासन व पोलिस प्रशासनाचे अभिनंदन*
==================================================================

लोकसभा निवडणुकीत मतदानाचा पवित्र हक्क बजावत लोकशाहीची मुल्ये अधिक बळकट करणा-या चंद्रपूर जिल्हयातील मतदार नागरिकांचे अर्थमंत्री तथा चंद्रपूर जिल्हयाचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी आभार व्यक्त केले आहे.

याबाबत प्रसिध्दीला दिलेल्या पत्रकात पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार म्हणतात, सर्वाधिक कडक उन्हाळा असणा-या देशातील प्रमुख जिल्हयांमधील एक जिल्हा म्हणजे चंद्रपूर जिल्हा आहे. उन्हाळयाच्या रणरणत्या उन्हात, जिवाची लाही लाही होणा-या उष्ण वातावरणात सुध्दा मतदारांनी रांगेत उभे राहुन जगातल्या सर्वात मोठया लोकशाही असलेल्या देशातील लोकशाहीच्या या उत्सवात सहभागी होत मतदानाचा पवित्र अधिकार बजावला. लोकशाहीच्या या उत्सवात उत्स्फुर्तपणे सहभागी होत लोकशाहीची मुल्ये जपत अधिक सुदृढ केली. या जिल्हयाचा पालकमंत्री म्हणुन सर्व मतदारांचे मी मनापासुन आभार मानतो.

अनेक मतदान केंद्रांवर दिव्यांग, आजारी, शारिरीक दुर्बलता असतांनाही हे पवित्र कार्य आहे असे समजुन रांगेत उभे राहत मतदान करून आपले कर्तव्य त्यांनी बजावले ही खरोखरच महत्वाची व अभिमानाची बाब आहे. विजय झाला तर माजायचे नाही आणि पराभव झाला तर लाजायचे नाही या सुत्रानुसार भाजपाने आजवर जनतेनी सेवा केली आहे व यापुढेही ही जनसेवा आम्ही निरंतर करु. भाजपा-शिवसेना-रिपाई (आ) महायुतीच्या माध्यमातुन हा सेवायज्ञ असाच आम्ही पुढे नेवु असेही त्यांनी म्हटले आहे.

चंद्रपूर जिल्हयात मतदानाची एकुणच प्रक्रिया अतिशय उत्तमपणे राबवत, कायदा व सुव्यवस्था अबाधित राखत जिल्हा प्रशासन, पोलिस प्रशासन यांनी उत्तम कामगीरी केली. त्याबद्दल जिल्हाधिकारी कुणाल खेमणार, पोलिस अधिक्षक डॉ. महेश्वर रेड्डी यांचे व त्यांच्या सर्व सहका-यांचे आपण मनःपुर्वक अभिनंदन करीत असल्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी म्हटले.